**प्रेस नोट**

**दिनांक :- २०/०४/२०२४**

# अंमलबजावणी :- अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कक्षाची कारवाई :

## मुंबई, चेम्बूर परिसरातून ०२ अल्पवयीन व ०१ प्रौढ बळीत मुलींची देहविक्रीतून मुक्तता

दिनांक १९/०४/२०२४ रोजी गुन्हे शाखा, अंमलबजावणी कक्षास त्यांच्या खास बातमीदारा मार्फत माहिती प्राप्त झाली की, शबनम उर्फ सुजाता नावाची महिला ही गि-हाईकांना शारिरीक सबंधाकरीता अल्पवयीन मुली पुरवून वेश्याव्यवसाय करीत आहे अशी माहिती प्राप्त झाल्यावर माहितीची शहानिशा करुन मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली.

दिनांक १९/०४/२०२४ रोजी वेश्यादलाल महिला नामे शबनम उर्फ सुजाता हसन शेख वय ३६ वर्षे हिने दोन अल्पवयीन बळीत मुलीस तिच्या पालकांच्या कायदेशीर रखवालीतुन फूस लावून देहविक्री करीता प्रवृत्त व उपलब्ध करून चेम्बूर पोलीस ठाणे हद्दीतील **''डायमंड गार्डन'' सायन ट्रॉम्बे रोड, चेम्बुर पुर्व मुंबई** या ठिकाणी शारिरीक सबंधाकरीता पुरविले व बळीत मुलींचा वेश्यागमनाचा मोबदला स्वत:च्या उपजिविकेसाठी स्विकारताना मिळून आल्याने तिच्या विरुध्द चेम्बूर पोलीस ठाणे येथे दिनांक २०/०४/२०२४ रोजी गुरक्र.२००/२०२४ कलम ३६६(अ), ३७०(अ) (१), ३७२ भा.द.वि सह कलम ४,५ अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा सह कलम १६,१७, १८ बालकांचे लैंगिक शोषणापासुन संरक्षण अधिनियम २०१२ सह कलम ८१, ८७ जे.जे ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**देह विक्री करण्याकरीता प्रवृत्त करणाऱ्या महिला आरोपीचे नाव :- शबनम उर्फ सुजाता हसन शेख, वय ३६ वर्षे.**

नमूद कारवाईत ०२ अल्पवयीन मुली व ०१ प्रौढ मुलींची देहविक्रीतून सुटका केली व रोख रक्कम रु १०,०००/- व अंदाजे किं.रु ८०००/- चा एक मोबाईल फोन चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची यशस्वी कामगिरी श्री. विवेक फणसळकर मा. पोलीस आयुक्त, श्री. देवेन भारती मा. विशेष पोलीस आयुक्त, श्री. लखमी गौतम मा. पोलीस सह आयुक्त, (गुन्हे), श्री. शशी कुमार मीना मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्रीमती रागसुधा आर. मा. पोलीस उप-आयुक्त (अंमलबजावणी), सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमलबजावणी यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कक्षाचे पोलीस निरीक्षक अनिता कदम, पो.शि.क्र.०९.१५७३/घाडी, पो.ह.क्र.३३५०३/जेडगुले, म.पो.शि.क्र. ११२०५८/दराडे यांनी यशस्वीरित्या पार पाडण्यात आलेली आहे.

--oo--